
ePaper

## ठाकरेंनी 'वर्षा' सोडलं, मुख्यमंत्रिपद नाही, बहुमत सिद्ध करू, राऊतांनी निक्षून सांगितलं



| वर्ष - 6 I अंक - 78 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | Iगुरुवार I दिनांक 23 जून 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

- पुणे :'मुख्यमंत्री म्हणून देवेंद्रजी येऊ दे !'
- पंढरीची वारी, दागिन्यांची चोरी !
- शरद पवार ॲक्शन मोडमध्ये!
- स्थानकाच्या फलाटावर नारायण राणेंनी केला योगा



राज्यसभा, विधानपरिषद निवडणुकीत महाविकास आघाडीचे तोंड काळे झाले आहे. सेनेच्या बहुसंख्य आमदारांचे मत भाजपसोबत युती करण्याचे होते. मात्र संजय राऊत यांनी उध्दव ठाकरे यांची दिशाभूल केली. यापूर्वी भुजबळ, राणे, राज ठाकरे यांनी शिवसेना सोडली, त्यावेळेपेक्षा आताची स्थिती वेगळी असून हे महाबंड आहे. शिंदे यांचा गटच खरी शिवसेना मानतो. भाजपने आता सरकार स्थापन्यासाठी पुढाकार घ्यावा. रिपाईला सत्तेत वाटा मिळायला हवा.

**-रामदास आठवले,** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया

“महाराष्ट्रातील महाविकास आघाडी सरकार हे सडकं फळ आहे, ते पडायलाच हवं. महाराष्ट्रात स्थापन झालेलं महाविकास आघाडी सरकार चुकीच्या पद्धतीनं स्थापन झालं आहे. कारण काँग्रेस आणि शिवसेना कधीच एकत्र होऊ शकत नाही. त्यामुळे ते सरकार हे सडकं फळ आहे. भाजपाला सत्तेपासून दूर ठेवणं, हाच त्यांचा एकमेव हेतू होता. ‘महाविकास आघाडीमधील शिवसेना ही बाळासाहेबांच्या विचारांची शिवसेना नाहीये, ती काँग्रेसची बी टीम असलेली शिवसेना आहे.

- ज्येष्ठ नेत्या, भाजपा



### ‘ज्ञानोबा-तुकाराम’च्या गजरात पालखी सोहळा पुण्यात

# विठ्ठल... विठ्ठल... पाउले चालती पंढरीची वाट..!

## हलक्या सरींच्या वर्षावाने वारकऱ्यांचा आनंद द्विगुणित, उत्साहाला उधाण

**।पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी**

गळ्यातील वीणेचा नादमय झंकार.. टाळ-मृदुंगाचा निनाद करीत धरलेला नादमय ताल.. पायी चालताना लाखो वारकऱ्यांनी मुखातून केलेला ‘ज्ञानोबा-तुकाराम’चा अखंड गजर.. भाविकांच्या कपाळावर टिळा आणि बुक्क्याचा नाम कोरणारे ‘गंध माउली’.. पालखी मार्गावर ठिकठिकाणी रेखाटलेल्या नयनरम्य रंगावलीच्या पायघड्या.. रत्याच्या दुतर्फा जमलेले सर्व वगोगटातील भाविक... बिस्किटे, फळे, राजगिरा लाडू यांसह अल्पाहार वितरित करून संतसेवा करणारे भाविक.. अशा भक्तिभावपूर्ण वातावरणात विठ्ठलनामाच्या गजरात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि संत शिरोमणी तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा बुधवारी पुण्यात दाखल झाला. हलक्या सरींच्या वर्षावाने वारकऱ्यांचा आनंद द्विगुणित झाला आणि त्यांच्या उत्साहाला उधाण आले.



आळंदी येथून मंगळवारी प्रस्थान ठेवलेल्या संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखीचा गांधी वाडा येथील आजोळघरी मुक्काम होता. तेथून सकाळी पालखीचे पुण्याकडे मार्गक्रमण झाले, तर आकुर्डी येथील तुकाराम महाराज यांची पालखी पुण्याकडे मार्गस्थ झाली. संत ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी दुपारी कळस येथे आल्यानंतर महापालिका आयुक्त विक्रम कुमार आणि अतिरिक्त आयुक्त विलास कानडे यांनी पालखीचे स्वागत केले. बोपोडी येथील हॅरिस पुलाजवळ संत तुकाराम महाराज यांची पालखी पोहोचताच अतिरिक्त आयुक्त कुणाल खेमनार आणि सहआयुक्त रवींद्र बिनवडे यांनी पालखीचे स्वागत केले.संगमवाडी येथे सायंकाळी साडेपाचच्या सुमारास संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचे आगमन झाले. त्यानंतर फर्ग्युसन रस्ता, टिळक चौक, लक्ष्मी रस्तामार्गे नाना पेठ येथील निवडुंग्या विठोबा मंदिरामध्ये पालखी सोहळा विसावला. तुकाराम महाराज पालखीच्या मागे संत गवरशेठ महाराज आणि संत संताजी जगनाडे महाराज यांची पालखी सोहळ्यामध्ये सहभागी झाली होती.

### हेलिकॉप्टरद्वारे पालखीवर पुष्पवृष्टी

लाखो वैष्णवांच्या भक्तिमय वातावरणात पुण्यनगरीत दाखल झालेल्या पालखी सोहळ्यावर पुणे बार असोसिएशनच्या वतीने हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी करण्यात आली. संचेती रुग्णालयाजवळील यशवंतराव चव्हाण स्मृती शिल्प चौक येथे राबविण्यात आलेल्या या अभिनव उपक्रमासाठी तीस किलो फुलांचा वापर करण्यात आला. न्यायाधीश आणि वकील मिळून तीनशेहून अधिक जण या उपक्रमामध्ये सहभागी झाले होते. अडथळ्यांची शर्यत पार करून संत ज्ञानेश्वर माउली आणि संत तुकाराम महाराज यांच्या आशीर्वादाने पुष्पवृष्टीचा उपक्रम यशस्वी करता आला .

# वायसीएम रुग्णालयात 206 कर्मचाऱ्यांची नेमणूक

## 206 कर्मचाऱ्यांची बाह्यस्त्रोतांद्वारे नेमणूक, मासिक 55 लाखांचा खर्च

**। पिंपरी-चिंचवड ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

महापालिकेच्या वायसीएम रुग्णालयात अपुरा कर्मचारी वर्ग असल्याने बाह्यस्त्रोतांद्वारे विविध पदांवरील अधिकारी, कर्मचारी उपलब्ध करून घेण्यात येणार आहेत. त्यानुसार, बीव्हीजी इंडिया यांच्यामार्फत तृतीय आणि चतुर्थ श्रेणीतील एकूण 206 कर्मचाऱ्यांची बाह्यस्त्रोतांद्वारे नेमणूक करण्यात येणार आहे. त्यांच्या पगारावर मासिक 55 लाख 39 हजार रुपये खर्च होणार आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेचे 750 खाटांचे यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम)रुग्णालय आहे. या रुग्णालयासाठी तज्ज्ञ डॉक्टरांसह परिचारिका, वॉर्ड बॉय, सफाईसेवक, फार्मासिस्ट अशा विविध पदांची गरज असते. महापालिकेत या पदांवर काही कर्मचारी हे कायमस्वरूपी आहेत. तर, काही कर्मचारी 6 महिन्यांच्या




कालावधीसाठी हंगामी स्वरूपात मानधनावर घेतले जातात. रुग्णालयात अपुरा कर्मचारी वर्ग असल्याने नोंदणीकृत संस्थेमार्फत अधिकारी, कर्मचारी बाह्यस्त्रोतांद्वारे उपलब्ध करून घेण्याचे महापालिकेचे प्रयोजन आहे. वायसीएम रुग्णालयाकरिता बीव्हीजी इंडिया लिमिटेड ही संस्था अनुबंधित केली आहे. या संस्थेला 1 ऑक्टोबर 2021 रोजी मनुष्यबळ पुरवठा करण्याचे आदेश दिले आहेत. ही संस्था ज्या कालावधीपर्यंत मनुष्यबळ पुरवठा करण्यास पात्र आहे, त्या श्रेणीतील पदे नेमणूक करण्यात येणार आहेत. त्यामध्ये तृतीय श्रेणीतील कनिष्ठ कारकून 18 पदे, स्टाफ नर्स 24 पदे, संगणक ऑपरेटर सहा पदे तसेच दूरध्वनी चालक, आहारतज्ज्ञ, दंत मेकॅनिक, श्रवणमापक तंत्रज्ञ, डायलिसिस तंत्रज्ञ, ईसीजी तंत्रज्ञ, ईईजी तंत्रज्ञ, भूलशास्त्र तंत्रज्ञ, सीएसएसडी तंत्रज्ञ, ऑपरेशन थियटर सहायक, ऑपरेशन थियटर तंत्रज्ञ, लॅब टेक्निशियन, ऑप्थेमेट्रीट अशी एकूण 99 पदे भरण्यात येणार आहेत. तसेच, चतुर्थ श्रेणीतील ब्लड बँक परिचर, प्रयोगशाळा परिचर, मजूर, आणीबाणी प्रभाग सेवक, शिपाई, ड्रेसर, क्ष-किरण परिचर अशी 107 पदे भरण्यात येणार आहेत. त्यानुसार, तृतीय आणि चतुर्थ श्रेणीतील एकूण 206 कर्मचाऱ्यांची बाह्यस्त्रोतांद्वारे नेमणूक करण्यात येणार आहे.

## शॉर्ट न्यूज »

### न्यायालयाकडून एकास पाच वर्षे सक्तमजुरी

।पुणे। महाईन्यूज।

जमीन वाटपाच्या वादातून कुऱ्हाडीने वार करून खुनाचा प्रयत्न केल्या प्रकरणी न्यायाधीश पी. पी. जाधव यांनी एकास पाच वर्षे सक्तमजुरीची शिक्षा सुनावली. जमीन वाटपाच्या वादातून कुऱ्हाडीने वार करून खुनाचा प्रयत्न केल्या प्रकरणी न्यायाधीश पी. पी. जाधव यांनी एकास पाच वर्षे सक्तमजुरीची शिक्षा सुनावली. राहुल राजाराम बोऱ्हाडे (वय ३७) असे शिक्षा सुनावलेल्याचे नाव आहे. याबाबत रामदास कुशाबा बोऱ्हाडे यांनी फिर्याद दिली होती. शिरुर तालुक्यातील सोनेसांगवी गावाच्या परिसरात ही घटना घडली होती. आरोपी राहुल बोऱ्हाडे आणि राजाराम भिकाजी बोऱ्हाडे यांनी राहुल यांचे भाऊ लक्ष्मण यांच्याकडे जमीन वाटपाबाबत विचारणा केली होती.

### राज्यात सुरू असलेल्या राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर शिवाजीनगर येथे उभारला फलक

# ‘मुख्यमंत्री म्हणून देवेंद्रजी येऊ दे !’

### भाजप पदाधिकाऱ्यांनी पालखी मार्गात उभारलेल्या फलकाची चर्चा

।पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी

विधानपरिषदेच्या निवडणुकीनंतर राज्यात वेगाने होत असलेल्या राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर ‘मुख्यमंत्री म्हणून देवेंद्रजी येऊ दे !’ असे फलक पालखी मार्गावर उभारत भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी पांडुरंगाला साकडे घातले आहे. पंढरपूर येथील विठ्ठल मंदिरात आषाढी एकादशीच्या सोहळ्यात विठ्ठलाची पूजा करण्याचा मान राज्याच्या मुख्यमंत्र्यांना आहे. मुख्यमंत्री सपत्निक विठ्ठलाची पूजा करतात. या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या शिवाजीनगर मतदारसंघातील स्थानिक पदाधिकाऱ्यांनी देवेंद्र फडणवीस पुन्हा मुख्यमंत्री व्हावेत, असे फलक पालखी मार्गावर उभारले आहेत. या फलकांची सध्या चर्चा सुरू आहे.




विधानपरिषदेच्या निवडणुकीनंतर राज्यातील राजकारणात मोठी उलथापालथ झाली आहे. शिवसेना नेते, नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या समर्थक आमदारांसह बंडखोरी केली आहे. त्यामुळे शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस या तीन पक्षांचे महाविकास आघाडी सरकार कोसळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या बदललेल्या राजकीय परिस्थितीत भारतीय जनता पक्षाला सत्ता स्थापन करण्याची संधी मिळेल, अशी चर्चा आहे. शिवाजीनगर मतदारसंघातील भाजप पदाधिकारी प्रकाश सोळंकी आणि रविंद्र साळेगांवकर यांनी हा फलक उभारला आहे. ‘हे माऊली तुझा कृपा आशीर्वाद सदैव राहू दे, तुझ्या पंढरपूरच्या पूजेला मुख्यमंत्री म्हणून देवेंद्रजी येऊ दे !’ असा मजकूर या फलकावर असून देवेंद्र फडणवीस आणि त्यांची पत्नी अमृता यांचे विठ्ठलाची पूजा करतानाचे छायाचित्र फलकावर दिसत आहे.

> पंढरपूर येथील विठ्ठल मंदिरात आषाढी एकादशीच्या सोहळ्यात विठ्ठलाची पूजा करण्याचा मान राज्याच्या मुख्यमंत्र्यांना आहे. मुख्यमंत्री सपत्निक विठ्ठलाची पूजा करतात. या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या शिवाजीनगर मतदारसंघातील स्थानिक पदाधिकाऱ्यांनी देवेंद्र फडणवीस पुन्हा मुख्यमंत्री व्हावेत, असे फलक पालखी मार्गावर उभारले आहेत. या फलकांची सध्या चर्चा सुरू आहे.

# रस्ते बंद केल्याने शहरभर कोंडी; वाहनचालकांना मनस्ताप

### पालखी आगमनानिमित्त शहरातील प्रमुख रस्ते दुपारनंतर बंद

।पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

पालखी आगमनानिमित्त शहरातील प्रमुख रस्ते बुधवारी दुपारनंतर बंद केल्याने शहरभर वाहतूक कोंडी झाली. प्रमुख रस्ते तसेच लगतचे छोटे रस्ते पोलिसांनी दुपारनंतर बांबुचे कठडे टाकून बंद केले. त्यामुळे वाहतूक कोंडीत भर पडली आणि वाहनचालकांना पर्यायी मार्ग उपलब्ध न झाल्याने मनस्तापाला सामोरे जावे लागले. पालखी आगमनानिमित्त शहरातील प्रमुख रस्ते बुधवारी दुपारनंतर वाहतुकीस बंद राहणार असल्याचे पोलिसांकडून जाहीर करण्यात आले होते.

त्यानुसार बुधवारी सकाळपासून पोलिसांनी लोखंडी तसेच बांबुचे कठडे टाकून जंगली महाराज रस्ता, फर्ग्युसन रस्ता तसेच लगतचे रस्ते वाहतुकीस बंद करण्यात आले. त्यामुळे वाहनचालकांना पर्यायी मार्ग उपलब्ध न झाल्याने कोंडीत भर पडली. सायंकाळनंतर लक्ष्मी रस्ता, शिवाजी रस्ता नाना, भवानी पेठेतील रस्ते वाहतुकीस बंद करण्यात आले.



> पालखी आगमनानिमित्त शहरातील प्रमुख रस्ते बुधवारी दुपारनंतर वाहतुकीस बंद राहणार असल्याचे पोलिसांकडून जाहीर करण्यात आले होते. त्यानुसार बुधवारी सकाळपासून पोलिसांनी लोखंडी तसेच बांबुचे कठडे टाकून जंगली महाराज रस्ता, फर्ग्युसन रस्ता तसेच लगतचे रस्ते वाहतुकीस बंद करण्यात आले.

#### कोंडीमागची कारणे

पालखी आगमनानिमित्त दरवर्षी शहरातील प्रमुख रस्ते वाहतुकीस बंद ठेवण्यात येतात. मात्र, प्रमुख रस्त्यांना जोडणारे उपरस्ते वाहतुकीस खुले ठेवण्यात येतात. प्रमुख चौकातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी प्रयत्न करण्यात येतात. यंदाच्या वर्षी प्रमुख रस्त्यांलगतचे उपरस्ते वाहतुकीस बंद ठेवण्यात आले तसेच कठडे उभे करण्यात आल्याने वाहनचालकांना पर्यायी मार्ग उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे शहरभर वाहतूक कोंडी झाली.

## खासदार सुप्रिया सुळे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या कार्यक्रमाला अनुपस्थित

### तातडीने मुंबईला बैठकीसाठी रवाना

।पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।



राज्यातील राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर खासदार सुप्रिया सुळे त्यांच्या संस्थेच्या कार्यक्रमाला अनुपस्थित राहिल्या. कार्यक्रमासाठी पुण्यात आलेल्या सुप्रिया सुळे तातडीने मुंबईला बैठकीसाठी रवाना झाल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांकडून देण्यात आली. यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने यशस्विनी सन्मान पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम बालगंधर्व रंगमंदिर येथे बुधवारी आयोजित करण्यात आला होता. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष, माजी केंद्रीय मंत्री शरद पवार हे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे अध्यक्ष तर खासदार सुप्रिया सुळे कार्याध्यक्ष आहेत. पुरस्कार वितरणाच्या या कार्यक्रमाला शरद पवार आणि सुप्रिया सुळे हे दोघेही उपस्थित राहणार असल्याचे जाहीर करण्यात आले होते. विधान परिषदेच्या निवडणुकीनंतर राज्यातील घडामोडींच्या पार्श्वभूमीवर शरद पवार कार्यक्रमाला उपस्थित राहणार नसल्याचे मंगळवारी रात्रीच स्पष्ट झाले होते. मात्र सुप्रिया सुळे संयोजक असल्याने त्या कार्यक्रमाला उपस्थित राहतील, असे राष्ट्रवादी काँग्रेसकडून सांगण्यात आले होते. मात्र कार्यक्रमासाठी पुण्यात आलेल्या सुप्रिया सुळे या तातडीने मुंबईकडे रवाना झाल्या. राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर मुंबईत तातडीची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या बैठकीसाठी सुळे मुंबईकडे रवाना झाल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

अरेरे संतापजनक ! वारीत चोरट्यांचा उच्छाद, 26 भाविकांचा लाखोंचा ऐवज केला लंपास

# पंढरीची वारी, दागिन्यांची चोरी !

## तीस वर्षीय तरुणीला ठार मारण्याची धमकी देऊन तिच्या गळ्यातील 73 हजार रुपयांचे गंठण हिसकावले



**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**तुकोबारायांची** वारी २१ जून रोजी श्री क्षेत्र देहूतून पंढरपूरसाठी मार्गस्थ झाली. यावेळी मोठ्या संख्येने जमणाऱ्या वारकरी व भाविकांच्या गर्दीचा गैरफायदा चोरट्यांनी उठवला. काही तासांत त्यांनी अनेक महिलांचे दागिने हिसकावले. पुरुषांची पाकिटे मारली. तर, वारकऱ्यांच्या बॅगा पळवल्या आहेत. त्याबाबत २६ गुन्हे दाखल झाले. त्यातही महिला भाविक दर्शन घेत असताना त्यांच्या गळ्यातील दागिने गर्दीचा गैरफायदा घेऊन महिला चोरट्यांनी हिसकावल्याच्या घटना यावेळी अधिक घडल्या. या महिला चेनस्नॅचर तथा सोनसाखळीचोर या शहराबाहेरून नगर व नांदेड जिल्ह्यातून या चोरीसाठी आल्या होत्या. चेनस्नॅचिंग (सोनसाखळी चोरी), पिकपॉकेटिंग (पाकिटमारी) आणि बॅग लिफ्टिंगचे (बॅगा चोरणे) २६ गुन्हे हे एकट्या संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या वारीतील आहेत. कालच आळंदीतून प्रस्थान ठेवलेल्या ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी सोहळ्यात अशा घडलेल्या गुन्ह्यांचा त्यात समावेश नाही. दरवर्षीच चोरटे आपला हिसका या दोन्ही पालखी सोहळ्यात दाखवतात. आता, तर एकटेदुकटे नाही, तर त्यांनी त्यासाठी टोळ्या तयार केल्याचे दिसून आले. तसेच महिला भाविकांना महिला चोरट्या लक्ष्य करू लागल्या आहेत.

पोलिसांनी काल पकडलेली अशी एक चोरांची गँग, तर नगर जिल्ह्यातील पाथर्डी येथून आल्याचे दिसून आले. त्यात एक महिला आहे. तिचे नाव पोलिसांनी दिले नाही. तर, सुनील दत्तू म्हस्के (वय २५), विलास हिरामण धोत्रे (वय २५), संतोष शहादेव म्हासळकर (वय २६), नागेश बारकू पवार (सर्व रा. पाथर्डी) अशी या इतर लुटारुंची नावे आहेत. या टोळीविरुद्ध जबरी चोरीचे दोन, तर दरोड्याचा एक असे तीन गुन्हे देहूरोड पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आले आहेत. काल भरदिवसा त्यांनी वारीत हे गुन्हे केले. तर, दुसऱ्या एका जबरी चोरीच्या गुन्ह्यातील तीन फरार आऱोपींत दोन महिला आहेत. त्यातील एक नांदेडची आहे, असे देहूरोड पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक वर्षाराणी पाटील यांनी सांगितले. २६ दाखल गुन्ह्यांपैकी पाच गुन्हे लगेच उघडकीस आणल्याची माहितीही त्यांनी दिली.

### अन् चोरटे पसार...

याच आरोपींनी याच म्हणजे तुकोबारायांच्या पालखीतच दुसऱ्या एका ४६ वर्षीय महिला भाविकाचे दोन तोळ्याचे गंठण हिसकावले होते. तर, त्यानंतर त्यांनी या पालखीच्या दर्शनासाठी आलेल्या गणेश टिळेकर (वय ३३,रा. देहूगाव) यांचे पाकिटही मारले होते. त्यात ५३ हजार पाचशे रुपयांची रोकड होती. दोन महिला आणि रतन घनवट (वय २५,रा.चिखली) अशा तिघांच्या वारीतील दुसऱ्या लुटारु टोळीने आणखी एका ४२ वर्षीय महिलेचे मिनी गंठण हिसकावून पळ काढला. ते, मात्र पोलिसांच्या हाती लागलेले नाहीत.

### भाविक महिलेचे मिनी गंठन चोरले; चारजण ताब्यात

पालखी सोहळ्यातील भाविक महिलेचे मिनी गंठण चोरणाऱ्या चार जणांना पोलिसांनी लगेचच ताब्यात घेतले आहे. शनी मंदिरजवळ महिला पालखीचे दर्शन घेत असताना हा प्रकार घडला. सुनिल म्हस्के (वय 25 वर्षे), विलास धोत्रे (वय 25 वर्षे), संतोष म्हासळकर (वय 26 वर्षे) आणि नागेश पवार (सर्व रा. पाथर्डी, जिल्हा अहमदनगर) यांना याप्रकरणी अटक केली आहे. याबाबत 46 वर्षीय महिलेने फिर्याद दिली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी पालखी शनी मंदिरजवळ आली असताना दर्शनासाठी गेल्या. त्यावेळी 73,096 रुपये किंमतीचे 2 तोळे वजनाचे सोन्याचे मिनी गंठण जे चैन मध्ये विणलेले होते ते आरोपींनी गर्दीचा फायदा घेत हिसकावून नेले.

### चोरट्यांमध्ये 31 महिला...

दरम्यान, वारीमध्ये चोऱ्या तथा गुन्हे होऊ नयेत म्हणून पोलिसांनी ५६ संशयितांना ताब्यात घेऊन त्यांच्याविरुद्ध प्रतिबंधक कारवाई केली होती. त्यात निम्यापेक्षा अधिक म्हणजे तब्बल ३१ महिला आहेत. त्यातून वारीमध्ये महिला चोरट्यांचा किती उपद्रव वाढला आहे, याची कल्पना येते.

त्यापैकी एका महिलेचा समावेश असलेल्या पाचजणांच्या पाथर्डीच्या टोळीने, तर देहूगाव कमानीजवळ पालखीचे दर्शन घेत असलेल्या तीस वर्षीय तरुणीला गराडाच घातला. एवढेच नाही, तर तिला ठार मारण्याची धमकी देऊन तिच्या गळ्यातील ७३ हजार रुपयांचे गंठण हिसकावले होते. या टोळीच्या मुसक्या पोलिसांनी आवळल्या आहेत.





प्रत्येक नागरिक निरोगी व्हावा, हे गरजेचे आहे- नारायण राणे

# स्थानकाच्या फलाटावर नारायण राणेंनी केला योगा

## आमदारांवर अंकुश नसल्याने काँग्रेस पराभव झाला

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**



विधानपरिषदेच्या दहाव्या जागेसाठी काल झालेल्या अटीतटीच्या निवडणुकीत कॉंग्रेसचे उमेदवार चंद्रकांत हंडोरे यांचा पराभव होऊन भाजपचे प्रसाद लाड यांच्या विजयाचा चमत्कार झाला. त्यावर आमदारांवर अंकुश नसल्याने कॉंग्रेस पराभूत झाल्याची प्रतिक्रिया भाजपचे केंद्रीय सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगमंत्री नारायण राणे यांनी पिंपरी-चिंचवडमध्ये दिली. राज्यासह देशातही कॉंग्रेसचं राहिलंय काय अशी विचारणा करीत ती संपत चालली असल्याचे त्यांनी सांगितले. कॉंग्रेस व त्यांचे नेते कामच करीत नसल्याची टीकाही त्यांनी केली.

आंतरराष्ट्रीय योगदिन राणे यांनी फुगेवाडी मेट्रो स्थानकात साजरा केला. देशातील नागरिकांना योगाचे महत्व व त्याचे लाभ सांगणे, या उद्देशाने योग दिन महत्वाचा आहे. आत्मनिर्भर होत असताना प्रत्येक नागरिक निरोगी व्हावा, हे गरजेचे आहे, अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली. मेट्रो स्थानकावर योगदिन साजरा होणे व फलाटावर योग सराव करणे, हे विशेष आहे. त्यातही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उद्घाटन केलेल्या स्थानकावर योग करताना नागरिकांना पाहणे, याचा आनंद आहे, असे ते म्हणाले.

या स्थानकावर आयोजित योग उत्सव व योग चित्र प्रदर्शनाचे उद्घाटनही त्यांनी यावेळी केले.

## संपादकीय »

### शिवसेना 'झुकेगा नही साला' मधून बाहेर येणार का

***एखाद्या पक्षाच्या नाराजांनी बंडखोरी केली तर राजकीय पक्ष बंडखोरी मोडून काढतो किंवा पक्ष बंडखोरीची तमा बाळगत नाही,याची उदाहरणे दिल्लीपासून महाराष्ट्राला नवीन नाहीत.***

घराणेशाहीची टीका झालेली काँग्रेस असो का राज्याच्या प्रादेशिक पक्षात क्रमांक एकचा शिवसेना पक्ष असो बंडाळी राजकीय पक्ष बंडाळीचा बीमोड करत आपली वाटचाल करत असतो. पण महाराष्ट्रात निर्माण झालेल्या अभूतपूर्व राजकीय परिस्थितीमुळे शिवसेनेच्या बंडातून एक नवी बाब आता अधोरेखित होणार असून पहिल्यांदा सर्वच प्रमुख नेते आणि एका मोठ्या फळीतील कार्यकर्त्यांच्या बंडापुढे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे 'झुकेगा नहीं साला' ही भूमिका सोडावी लागेल अशी राजकीय परिस्थिती निर्माण झाली आहे.दरम्यान,इतक्या मोठ्या संख्येने शिवसेनेच्या मंत्री व आमदारांनी वेगळे होण्याचा निर्णय घेणे म्हणजे काँग्रेस आणि राष्ट्रवादी पक्षाच्या आघाडी सरकारमध्ये खरचं या सर्वांची घालमेल होत होती हे कुणी नव्याने सांगण्याची आता गरज नाही,हेच सत्य आहे.

शिवसेनेचे चाणक्य संजय राऊत यांनी गेल्या वर्षभरात भाजपाला डीचवणे आणि पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी राष्ट्रवादीच्या भरवशावर स्वपक्षातील मंत्री आणि आमदारांना दुर्लक्षित करणे या दोन्ही बाबी शिवसेनेला मारक ठरल्या आहेत.विधानपरिषद निवडणुकांच्या विजयाचा जल्लोष आणि काँग्रेसच्या पराभवाची कारणमिमांसा संपते न संपते तोच एक नवा अध्याय राज्याच्या राजकारणात सुरू झाला.उद्धव ठाकरे यांनी हिंदुत्वाच्या मुद्द्यावर काँग्रेस- राष्ट्रवादीची साथ सोडून भाजपासोबत सरकार स्थापन करावे या अटीवर एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेचे ३३ तर अपक्ष सात अशा एकूण ४० आमदारांना सोबत घेऊन उघड बंडखोरी केली आहे.सुरतहून आसाममधील गुवाहाटी येथे सर्व बंडखोर असून शिवसेनेत उभी फूट पडली नव्हे आख्खी शिवसेनाच शिंदे यांनी हायजॅक केल्याने राज्यात मोठा पेच निर्माण झाला आहे.एकनाथ शिंदे यांनी आमच्याकडे बहुमत असल्याचे म्हटले असून शिवसेनेने निवडलेला गटनेता हा घटनाबाह्य असल्याचेही नमूद केल्याने अधिकच गोंधळ निर्माण झाला होता.तथापि पक्षाचे एक तृतीयांश आमदार शिंदे यांच्याकडे असल्याच्या परिस्थितीमुळे शिवसेनेला महाविकास आघाडीसोबत राहणे आता परवडणारे नाही. सत्तेतील पक्षाकडे विरोधक आमदार व नेते येत असतात मात्र महाराष्ट्रात पहिल्यांदा प्रमुख सत्ता पक्षातील मंत्री व आमदार आपल्यात असलेल्या असंतोषातून स्वपक्षातील बाहेर पडले आहेत.देशात व राज्यात पहिल्यांदा विरोधी पक्षासोबत सरकार स्थापन करा असा अट्टाहास धरणाऱ्या शिवसेनेच्या एका मोठ्या गटाने बंडखोरी करत एकनाथ शिंदे यांनी या गटाचे नेतृत्व करत शिवसेना पक्षच एकप्रकारे हायजॅक केला आहे.

# बंड नेमके हिंदुत्वासाठी की महत्वाकांक्षेसाठी..?






कडवट आणि निष्ठावंत शिवसैनिक शिवसेनेसाठी कोणत्याही पदाच्या लालसेविना अखंड राबत आहेत. अशा हजारो शिवसैनिकांच्या तुलनेत एकनाथ शिंदे यांच्यासारखा भाग्यवान शिवसैनिक दुसरा असू शकत नाही. अशा स्थितीमध्ये ज्या स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांना ठाणे जिल्हाप्रमुख केले, तेच एकनाथ शिंदे जेव्हा शिवसेनेचे तीस-पस्तीस आमदार थेट गुजरातमध्ये घेऊन जातात, यासारखे दुसरे दुर्दैव कोणतेही असू शकत नाही. स्वतःच्या राजकीय महत्त्वाकांक्षेपोटी एकनाथ शिंदे हे आहेत, त्यापेक्षादेखील अधिक मोठ्या पदावर जातील देखील, मात्र त्यांनी त्यासाठी शिवसैनिकांच्या निष्ठेला आणि प्रेमाला पाडलेले भगदाड हे कधीही भरून येणार नाही.

मंगळवार 21 जून 2022 हा दिवस महाराष्ट्राच्या आणि त्याचबरोबर शिवसेनेच्या इतिहासात काळ्या अक्षरांनी लिहिला जाईल. याचं प्रमुख कारण म्हणजे राज्यातील शिवसेनेचे क्रमांक दोनचे नेते सरकारमधील नगर विकास या अत्यंत महत्वाच्या खात्याचे कॅबिनेट मंत्री तसेच ठाणे आणि गडचिरोली या दोन जिल्ह्यांचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्याचे मुख्यमंत्री तसेच शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या भूमिकेविरोधात पुकारलेले उघड-उघड बंड हे होय. राज्यात 2019 मध्ये अभूतपूर्व असे सत्तांतर झाले आणि शिवसेनेने भाजपबरोबर काडीमोड घेऊन काँग्रेस-राष्ट्रवादी बरोबर सरकार स्थापन केले या सरकार स्थापनेच्या वेळीदेखील या सरकारमधील आत्ताचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि विधानसभेचे विरोधी पक्ष नेते देवेंद्र फडणवीस यांचा पहाटेचा शपथविधी प्रचंड वादग्रस्त ठरला आणि विशेष म्हणजे अजित पवार यांना राष्ट्रवादीत परत आणण्यामध्ये त्यावेळी एकनाथ शिंदे यांचा सिंहाचा वाटा होता. मग गेल्या अडीच तीन वर्षात राज्यात स्वतःच्या पक्षाचे पक्षप्रमुख राज्याचे मुख्यमंत्री असताना आणि ठाण्याशी त्यांचे अत्यंत घरोब्याचे आणि कौटुंबिक संबंध असताना नेमके असे काय घडले की ज्यामुळे एकनाथ शिंदे यांच्यासारख्या अत्यंत कडवट आणि निष्ठावंत शिवसेना नेत्यावर एवढे टोकाचे पाऊल उचलण्याची वेळ आली?

शिवसेनेच्या इतिहासात ठाणे जिल्ह्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे, कारण शिवसेनेला सत्तेचा पहिला मार्ग ठाण्याने दाखवला. ठाणे पालिकेवर भगवा फडकला नंतर काही वर्षांनी मग मुंबई महापालिकेवर शिवसेनेचा भगवा फडकला. त्यामुळे ठाणे जिल्ह्यातील शिवसेना आणि मातोश्री यांचे एक अतूट जिव्हाळ्याचे आपुलकीचे नाते गेले वर्षानुवर्ष आहे. एकनाथ शिंदे हे नाव खरंतर गेल्या दोन-अडीच दशकात ठाण्यातील राजकारणात झपाट्याने वर आले. आणि याला प्रमुख कारण म्हणजे शिवसेनेचे अत्यंत जहाल आणि कडवट ठाणे जिल्हाप्रमुख स्वर्गीय आनंद दिघे यांचा अपघाती झालेला मृत्यू हे होय. स्वर्गीय आनंद दिघे यांच्या मृत्यूनंतर ठाणे जिल्ह्यातील शिवसेना पोरकी झाली होती. शिवसेना नेतृत्वाने आधी बदलापूरचे मनोहर अंबावणे आणि त्यानंतर ठाण्यातील एच रघुनाथ मोरे अशा दोघांवर ठाणे जिल्हा प्रमुख पदाची जबाबदारी देऊन पाहिली होती.




9970885936



### उम्मीदों के सागर से

जो धाराओं में बहती थी
जो आशाओं के तर रहती थी
जो गंगा जेसी गहरी भी थी
वो उम्मीदों के सागर से थी
जो उम्मीदों से नयन सजाती थी
जो राखी को प्रेम बनाती थी
जो शीशे के राज में आती थी
वो उम्मीदों के सागर से थी
जो छाँव में पीपल के रहती थी
जो बाहों के आंचल में बहती थी
जो छुप छुप कर आंखों में आती थी
वो उम्मीदों के सागर से थी
जो मेरे कलम की ताकत भी थी
जो मेरे आंखों की आहट भी थी
जो नयनों को मेरे ठग लेती थी
वो उम्मीदों के सागर से थी!

# निवडणुकांचा चित्तथरारक तिसरा अंक सुरू

**महाराष्ट्राच्या ताज्या सत्तानाट्यातील पहिला अंक राज्यसभेच्या निवडणुकांनी झाला होता. दुसरा अंक होता, विधान परिषदांच्या निवडणुकांचा. हा दुसरा अंक संपतो ना संपतो, तोच चित्तथरारक तिसरा अंक सुरू झाला आहे.**

आता या तिसऱ्या अंकाचा शेवट आणि या नाटकाचे 'भरतवाक्य' काय होते, ते लगेच समजणार नाही. त्याला थोडा वेळ लागेल. या नाटकातील पहिल्या दोन अंकांवर भारतीय जनता पक्षाचा प्रभाव राहिला आहे; किंबहुना या दोन अंकांमध्येच तिसऱ्या निर्णायक अंकाचे कथाबीज पेरले गेले होते. तेच आता रंगतदार कथानकातून आकार घेत आहे. राज्यसभा आणि विधान परिषद यांच्या निवडणुकांमध्ये एक महत्त्वाचा फरक असतो. तो म्हणजे, राज्यसभेचे मतदान एका अर्थाने खुले असते. म्हणजे, आपली मतपत्रिका प्रत्येक आमदाराने आपल्या पक्षाच्या प्रतोदाला दाखविणे आवश्यक असते.

छोटे पक्ष आणि अपक्ष आमदारांना स्वाभाविकच हा नियम लागू नसतो. राज्यसभा आणि विधान परिषद यात भाजपने मिळविलेल्या मतांमधला फरक



प्रामुख्याने या कारणाने पडला आहे. या वेळच्या विधान परिषदेच्या निवडणुकीत केवळ पक्षांना मिळालेली मते आणि त्यांच्या आमदारांची संख्या यांतील फरक मोजून काहीही समजणार नाही. याचे कारण, सत्ताधारी आघाडीतील पक्षांच्या आमदारांनी मनसोक्त 'क्रॉस व्होटिंग' केलेले दिसते. गुप्त मतदानाचा असा पुरेपूर लाभ उठवल्यामुळेच, राज्यसभेपेक्षा भाजपला ११ मते वाढलेली दिसतात. या निवडणुकीत काँग्रेसला फटका बसणार, हे आधीपासूनच दिसत होते. फक्त तो कुणाला बसतो, याचे कुतूहल होते. चंद्रकांत हंडोरे यांच्यासारख्या जुन्या दलित कार्यकर्त्याला सत्ताधारी महाविकास आघाडी निवडून आणू शकली नाही, हे केवळ काँग्रेस पक्षाचे अपयश नाही. ते शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या इतर दोन पक्षांचेही आहे. या सत्ताधारी आघाडीत काँग्रेसला नेहमीच तिय्यम भूमिका देण्यात आली. बरोबरीने वागवण्यात आले नाही. काँग्रेसला याचा दुहेरी फटका बसताना दिसतो आहे. एक तर विधान परिषदेची एक जागा गेली आणि आता अनेक आमदार पक्षनेतृत्वावर नाराज असल्याच्या चर्चाही सुरू झाल्या. राज्यसभेचा फटका बसल्यानंतर शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांनी 'आमचे आम्ही बघू' ही आघाडी धर्माला न साजेशी अशी भूमिका घेतली. अर्थात, पुढच्या काही तासांतच होणाऱ्या आपल्या पक्षातील बंडखोरीचा ज्यांना अंदाज येत नाही, त्यांनी आघाडीतील सर्व पक्षांना एकत्र बांधून समन्वयाने रणनीती आखावी, अशी अपेक्षा ठेवताच येत नाही.

## ।। अभंगवाणी ।।



आहांच वाहांच आंत वरी दोन्ही ।
न लगा गडणी आम्हां तैशा ॥१॥
भेऊं नये तेथें भेडसावूं कोणा ।
आवरूनि मना बंद द्यावा ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### राज्यात २५ हजार कोरोनाचे अॅक्टिव्ह रुग्ण,

। नागपूर। महाईन्यूज ।

देशात ८१ हजार सक्रीय रुग्ण असून त्यातील २५ हजार एकट्या महाराष्ट्रातील आहेत, अशी माहिती बुधवारी राज्य मंत्रिमंडळ बैठकीत देण्यात आली. रुग्णालयात ४.६४ टक्के कोरोना रुग्ण असून मुंबईत सध्या जवळपास ३० टक्के पॉझिटीव्हीटी असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. राज्यातील रुग्ण संख्येत सातत्याने वाढ होत असून सध्या दिवसाला ४ हजार रुग्ण आढळत आहेत. त्यामुळे मास्क घालणे, आरोग्याचे नियम पाळणे आवश्यक आहे, असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी बैठकीत सांगितले.काही दिवसांपूर्वी राज्यात दर दिवशी २०० ते ३०० रुग्ण आढळत होते.

आता दररोज ४ हजार रुग्ण आढळत असून रुग्ण संख्येत ३६ टक्के वाढ झाली आहे. यापैकी ९० टक्के रुग्ण मुंबई, पुणे, ठाणे, रायगड, पालघर या जिल्ह्यातील आहेत. सध्या २५ हजार सक्रीय रुग्ण असून १ टक्का रुग्ण ऑक्सिजनवर आहेत तर २२ रुग्ण व्हेंटिलेटरवर आहेत, अशी माहिती आरोग्य विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ.प्रदीप व्यास यांनी दिली.व्यक्तिने घेतलेली नाही.तसे प्रयत्न करायला हवे, त्यात काही गैर नाही.

### उद्या होणार महत्त्वाची बैठक

# शरद पवार ॲक्शन मोडमध्ये!

## राष्ट्रवादीच्या सर्व आमदारांना मुंबईत बोलावलं

। मुंबई । महाईन्यूज ।

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून शिवसैनिक तसेच नाराज आमदारांशी संवाद साधला आहे. आमदारांना भावनिक साद घालून त्यांनी परत येण्याचे आवाहन केले आहे. तुमची इच्छा असेल तर मी मुख्यमंत्रिपद सोडायला तयार आहे, असे उद्धव ठाकरे बंडखोर आमदारांना उद्देशून म्हणाले आहेत. असे असतानाच आता राष्ट्रवादीच्या गोटात हालचाली वाढल्या आहेत. राष्ट्रवादीने आपल्या सर्व आमदारांची बैठक बोलावली आहे.

राष्ट्रवादीच्या सर्व आमदारांनी बैठकीला हजर राहण्याचे आदेश राष्ट्रवादी काँग्रसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी दिले आहेत. या बैठकीत शरद पवार आमदारांना मार्गदर्शन करणार आहेत. त्यामुळे



उद्याच्या बैठकीत काय होणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. याच बैठकीबाबतची अधिक माहिती राष्ट्रवादीचे नेते दत्तात्रय भरणे यांनी दिली आहे.

"मंत्रिमंडळ बैठकीच्या निमित्ताने आम्ही सर्व मंत्री एकत्र आलो होतो. उद्या राष्ट्रवादी पक्षाची बैठक बोलावण्यात आली आहे. शरद पवार यांची बैठक आहे त्यामुळे सर्वच आमदार हजर राहणार आहेत. जयंत पाटील यांनी ही बैठक

> "राष्ट्रवादीच्या सर्व आमदारांनी उद्या बैठकीला हजर राहण्याचे आदेश राष्ट्रवादी काँग्रसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी दिले आहेत. या बैठकीत शरद पवार आमदारांना मार्गदर्शन करणार आहेत. त्यामुळे उद्याच्या बैठकीत काय होणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. याच बैठकीबाबतची अधिक माहिती राष्ट्रवादीचे नेते दत्तात्रय भरणे यांनी दिली आहे."

बोलावली आहे," असे भरणे यांनी बोलताना सांगितले आहे.

तसेच, "मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे भाषण सर्वांनीच एकले आहे. मात्र उद्या राष्ट्रावादीची बैठक बोलावण्यात आली आहे. सरकार धोक्यात आहे की नाही हे उद्याच्या बैठकीनंतर तसेच काही घडामोडी घडल्यानंतरच हे समजू शकेल," असेदेखील दत्तात्रय भरणे म्हणाले.



## मोहमाया-सत्तेचा लोभ नाही, उद्धव ठाकरेच मुख्यमंत्री राहतील

### संजय राऊतांनी व्यक्त केला विश्वास

। मुंबई । महाईन्यूज ।

एकनाथ शिंदे यांनी पुकारलेल्या बंडखोरीवरून राज्यातील राजकारण ढवळून निघालं आहे. उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांनी नुकतीच आपली बाजू मांडली. आता संजय राऊत यांची प्रतिक्रिया समोर येत आहे. आम्ही लढणारे लोक आहोत आणि लढत राहू. शेवटी सत्याचा विजय होतो, असं संजय राऊत म्हणाले आहेत.

मोहमाया, सत्ता याचा आम्हाला अजिबात लोभ नाही. सध्या आमच्या सोबत असलेल्या दोन्ही पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आम्ही तुमच्यासोबत आहोत अशा सद्भावना व्यक्त केल्या आहेत, असं संजय राऊत यांनी म्हटलं आहे.

मातोश्री हे शिवसेना आणि शिवसेनाप्रमुखांचं मूळ स्थान आहे, त्यामुळे ते वर्षावरून मातोश्रीवरून जाणं साहजिकच आहे, असंही संजय राऊत यांनी स्पष्टीकरण दिलं. एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री करणाऱ्या तुम्ही चुकीच्या बातम्या चालवत आहात. त्या कृपया बंद करा. मुख्यमंत्री उद्धव ठाकरेच आहेत आणि तेच राहतील, असंही त्यांनी पुढे स्पष्ट केलं.

सभागृहात जेव्हा बहुमत सिद्ध करण्याची वेळ येईल तेव्हा आम्ही ते नक्कीच सिद्ध करण्याचा प्रयत्न करू, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केली.

एकनाथ एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री करण्याचा कोणताही सल्ला शरद पवारांनी मुख्यमंत्र्यांना दिलेला नाही. उलट त्यांनी आपण ही लढाई शेवटपर्यंत लढत राहू अशीच भावना व्यक्त केली आहे.

### मराठ्यांनी मराठ्यांना आर्थिकदृष्टया सक्षम करण्यासाठी बैठकीचे यशस्वी आयोजन

# पालघर जिल्हा मराठा उद्योजक लॉबी परिवाराची बैठक उत्साहात

## मराठा उद्योजक बांधवांचा बैठकीला हाऊसफुल प्रतिसाद...

। पालघर । महाईन्यूज ।
विशेष प्रतिनिधी

उदिष्ट मराठा घडवण्याचे, व्यवसायिक घडवण्याचे, तसेच सामाजिक दृष्टया एकत्र येण्याचे अशी विविधांगी उद्दिष्ट्ये समोर ठेऊन एकत्र तर सर्वत्र हे ब्रिद घेऊन संपूर्ण महाराष्ट्रभर कार्यरत असलेल्या मराठा उद्योजक लॉबी पालघर जिल्हा परिवाराच्यावतीने आयोजित करण्यात आलेली बैठक रविवार दिनांक 19 जून रोजी सकाळी 10 ते 1 या वेळेत उत्साहात पार पडली.

या बैठकीला विविध क्षेत्रातील मान्यवरांची प्रामुख्याने उपस्थिती



लाभली. मराठा उद्योजक लॉबी संस्थापक अध्यक्ष विनोद बढे, कोकण /पालघर संपर्क प्रमुख- कृषीभाऊ, मुंबई अध्यक्ष- कल्पेश शेलार, कल्याण डोंबवली संघटक - मंगेश शेळके, मालाड ऍडमिन-संदीप शिंदे छायाताई इंदुलकर, पालघर जिल्हाध्यक्ष कल्पेश सकपाळ, कार्याध्यक्ष राम मंडलिक, शिव व्याख्याते के. के. भालेकर, आदी मान्यवरांच्या प्रेरणादायी भाषणाने मराठा उद्योजक लॉबी पालघर टीममध्ये नवचैतन्य पहायला मिळाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वसई तालुका संपर्क प्रमुख सचिन पवार यांनी केले.

> **"मराठा उद्योजक लॉबीचा वसईमध्ये पहिलाच कार्यक्रम असल्याने मनामध्ये थोडी धाकधुक होती आदल्या दिवशी रात्रभर झोप लागली नाही. सकाळी उठल्यावर आमची तयारी सुरु झाली. ज्याची भीती होती तेच झाले. हलक्याशा पावसाला सुरुवात झाली. परंतु बोलतात ना पेरल तेच उगवते. या उक्तिप्रमाणे आपले मराठा बांधव विचारांची शिदोरी घेण्यासाठी पावसात भिजत सुद्धा पोहचले. उपस्थित सर्व बांधवांचे मनपूर्वक आभार.**
>
> **सचिन पवार, वसई तालुका संपर्क प्रमुख**

## शॉर्ट न्यूज »

### सोनिया गांधींनी ईडीकडे वेळ वाढवून मागितला

**। नवी दिल्ली। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

काँग्रेस अध्यक्ष सोनिया गांधी यांनी बुधवारी ईडी कार्यालयात जाण्यासाठी वेळ मागितला आहे. याबाबत जयराम रमेश यांनी ट्वीट करून ही माहिती दिली आहे. यावेळी त्यांनी सोनिया गांधी यांनी श्वसन नलिकेत झालेल्या संक्रमणामुळे त्यांना डॉक्टरांनी घरी आराम करण्याचा सल्ला दिल्याचे त्यांनी सांगितले.

काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांनी ईडीला एक पत्र लिहिले आहे. या पत्रात त्यांनी ईडीकडे चौकशीला हजर राहण्यासाठी काही आठवड्यांची वेळ वाढवून द्यावी, अशी मागणी केली आहे.

नॅशनल हेराल्ड वृत्तपत्राशी संबंधित कथित मनी लॉड्रिंग प्रकरणी काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांना ईडीने 23 जून रोजी समन्स बजावले आहे. कोविड-19 च्या प्रकृतीच्या कारणास्तव सोनियाला नुकतेच दिल्लीतील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, तेथून त्यांना सोमवारी संध्याकाळी डिस्चार्ज देण्यात आला. याच प्रकरणात, ईडीने राहुल गांधींची पाच दिवसांत 50 तासांहून अधिक चौकशी केली आणि यादरम्यान मनी लॉंडरिंग प्रतिबंधक कायद्यांतर्गत त्यांची जबानी नोंदवण्यात आली. काँग्रेसने ईडीच्या

# कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ, उद्धव ठाकरेंनी व्यक्त केल्या भावना!

## एकनाथ शिंदेंच्या बंडावर बोलताना उद्धव ठाकरेंनी मांडली व्यथा

**।नवी दिल्ली । महाईन्यूज ।**

"शिवसेनेवर तिचंच लाकूड वापशिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी बंड पुकारल्यानंतर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी फेसबुकच्या माध्यमातून लाईव्ह करत आपली भूमिका मांडली आहे. उद्धव ठाकरे यांनी यावेळी बंडखोर आमदारांना समोर येऊन आपण मुख्यमंत्रीपदासाठी लायक नसल्याचं सांगावं असं आवाहन केलं आहे. तसंच मुख्यमंत्रीपद आणि शिवसेना पक्षप्रमुखपदाची जबाबदारी सोडण्याची तयारीही दर्शवली आहे. आपल्या भावना व्यक्त करताना उद्धव ठाकरेंनी यावेळी एक गोष्ट सांगत व्यथा मांडली.

"मी राजीनामा देण्यास तयार आहे. आज मी माझ्या राजीनाम्याचं पत्र तयार करुन ठेवत आहे. जे आमदार गायब आहेत किंवा त्यांना गायब केलं आहे त्यांनी माझ्या राजीनाम्याचं पत्र घेऊन राजभवनात जावं. मला कोविड झाला असल्याने मी जात नाही. त्यातही राज्यपाल उद्धव ठाकरेंनी यावं सांगितलं तर येण्यास तयार आहे,"



### उद्धव ठाकरेंनी सांगितली कुऱ्हाडीची गोष्ट

"कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ ही म्हणे आपल्या सर्वांना माहिती आहे. पण त्यामागची गोष्ट कोणाला माहिती नाही. ती गोष्ट अशी आहे की, एकदा एका जंगलात लाकूडतोड्या झाड तोडत होता. कुऱ्हाडीचे घाव घालत असताना तिथे राहणारे पक्षी कासावीस झाले. पण घाव घातले जात असताना झाडाला किती वेदना होत असतील. म्हणून ते पक्षी झाडासोबत बोलू लागले. पक्षांनी दादा खूप दुखत असेल ना? वेदना होत असतील ना? असं विचारलं. त्यावर झाडाने उत्तर दिलं की, मला वेदना आणि दु:ख घावांचं नाही, तर हा लाकूडतोड्या ज्या कुऱ्हाडीने घाव घालत आहे, त्याचं लाकूड माझ्या फांदीचं आहे, याच्या वेदना जास्त होत आहेत. हेच आज चाललं आहे," अशी व्यथा उद्धव ठाकरेंनी मांडली.

माझ्यासोबत शिवसैनिक आहेत तोवर मी कुठल्याही आव्हानाला सामोरं जाईन. मी पाठ दाखवणारा नाही. काहीजण ही बाळासाहेबांची शिवसेना राहिली नाही असा आरोप करत आहेत. ज्या शिवसैनिकांना मी शिवसेनेचं नेतृत्व असेल त्यांनी सांगावं. मी पक्षप्रमुख पद सोडायला तयार आहे. हे विरोधकांनी सांगू नये, असे फडतूस लोक फार आहेत. मी फक्त शिवसैनिकांना बांधील आहे. त्यांनी सांगितलं तर मी दोन्ही पद सोडण्यास तयार आहे.

# "मोदी असताना सर्व काही शक्य", एकनाथ शिंदे प्रकरणावर काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्याचा संताप



**।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

शिवसेना नेते एकनाथ शिंदे बंड पुकारण्याची शक्यता असल्याने राज्यात निर्माण झालेल्या स्थितीवर राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी भाष्य केलं असून केंद्र सरकारवर टीका केली आहे. सरकारं पाडण्यासाठी कट आखले जात असल्याचा आरोप अशोक गेहलोत यांनी केला आहे. राहुल गांधी यांच्या ईडी चौकशीविरोधात काँग्रेस दिल्लीमध्ये सत्याग्रह आंदोलन करत आहे. यादरम्यान अशोक गेहलोत यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला.

"संविधानाची पायमल्ली केली जात असून सक्तवसुली संचालनालय आणि प्राप्तिकर विभागाचा गैरवापर केला जात आहे. जेव्हा न्याय मिळत नाही तेव्हा आपण न्यायव्यवस्थेकडे जातो. पण आता न्यायवस्थाच दबावात आहे. हा खूप धोकादायक खेळ ठरत आहे," असं अशोक गेहलोत म्हणाले आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात देशात सर्व काही शक्य आहे. गुन्हे, अन्याय, अत्याचार सर्व काही शक्य आहे, असे गेहलोत म्हणाले. "भाजपाचा लोकशाहीवर विश्वास नाही. केवळ सत्ता बळकावण्यासाठी लोकशाहीचा मुखवटा घालून राजकारण केलं जात आहे," असा आरोप अशोक गेहलोत यांनी केला आहे.

"हिंदुत्वाच्या नावाखाली देशात लोकशाही ढासळत चालली आहे, लोकांना आता समजत नाहीये, पण नंतर पश्चाताप होईल. कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती नाजूक असताना आणि अर्थव्यवस्था कमकुवत झाली असताना हे लोक (भाजपा) घोडेबाजार करत सरकारं पाडत आहेत," अशी टीका अशोक गेहलोत यांनी केली आहे. राजस्थानमधील आमदारांना आगाऊ रक्कम म्हणून १० लाख रुपये वाटण्यात आले असल्याचा आरोप यावेळी त्यांनी केला.

# भूकंपामुळे अफगाणिस्तान उद्ध्वस्त

## 280 लोकांचा मृत्यू, शेकडो घरं कोसळली



**।नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

अफगाणिस्तानमध्ये बुधवारी सकाळी झालेल्या भूकंपामुळे मोठ्या प्रमाणात जीवित व वित्तहानी झाली आहे. 6.1 रिश्टर स्केलच्या या भूकंपामुळे अफगाणिस्तानमध्ये जवळपास 280 लोकांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. तर 250 जण जखमी झाले आहेत. अफगाणिस्तानला लागून असलेल्या पाकिस्तानमध्येही अनेक भागात विध्वंस झाला आहे. यूएस जिओलॉजिकल सर्व्हे (यूएसजीएस) नुसार, भूकंपाचा केंद्रबिंदू अफगाणिस्तानमधील खोस्ट शहरापासून 40 किमी अंतरावर होता. या भूकंपाचा प्रभाव 500 किमीच्या अंतरापर्यंत जाणवला होता. सरकारचे प्रवक्ते बिलाल करीमी यांनी ट्विट केले, दुर्दैवाने, काल रात्री (स्थानिक वेळेनुसार) पक्तिका प्रांतातील चार जिल्ह्यांमध्ये तीव्र भूकंप झाला. ज्यात आपले शेकडो अफगाणी नागरिक नागरिक मारले गेले आणि जखमी झाले, तर डझनभर घरे उद्ध्वस्त झाली.

# शिवसेनेनंतर काँग्रेसमध्ये बंडाची शक्यता

## डॅमेज कंट्रोल करण्याची कमलनाथांवर जबाबदारी

**।नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**


काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांनी सावधगिरी बाळगत हे डॅमेज कंट्रोल सांभाळण्याची जबाबदारी मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री कमल नाथ यांच्यावर सोपवली आहे. नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बंडखोरीमुळे महाराष्ट्राचे राजकरण ढवळून निघाले असून या बंडाचे लोण आता काँग्रेसमध्येही पोहचण्याची शक्यता आहे. यामुळे काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांनी सावधगिरी बाळगत हे डॅमेज कंट्रोल सांभाळण्याची जबाबदारी मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री कमल नाथ यांच्यावर सोपवली आहे.



याचपार्श्वभूमीवर कमल नाथ तातडीने मुंबईत पोहचले आहेत. पक्षाने त्यांची महाराष्ट्राचे निरिक्षक म्हणून नेमणूक केली आहे. कमल नाथ महाराष्ट्रातील सध्याच्या राजकीय घडामोडींवर काँग्रेससह इतर पक्षातील ज्येष्ठ नेत्यांबरोबर चर्चा करणार आहेत. यावेळी मविआ नेत्यांकडून काही महत्वाचे निर्णय घेण्यात येण्याची शक्यता आहे. त्यानंतर कमल नाथ या बैठकीत झालेल्या चर्चेची माहिती सोनियांना देणार आहेत. दरम्यान, मुंबईत पोहचताच कमल नाथ यांनी सध्या देशात सौद्याचे राजकारण सुरू असून मध्यप्रदेशमध्ये जे काही झाले त्याबद्दल सगळ्यांना माहित असल्याचे सांगितले. तसेच सध्याचे राजकारण हे आपल्या देशाच्या संविधानाच्या नेमक्या विरुद्ध पद्धतीने सुरू असून भविष्यासाठी धोकादायक असल्याचा इशाराही यावेळी कमल नाथ यांनी दिला. तसेच आता शिवसेनेला स्वत:लाच आमदारांबरोबर बोलण्याचा निर्णय घ्यावा लागणार असल्याचेही कमल नाथ यांनी म्हटले. यादरम्यान काँग्रेसमध्ये कोणीही विकाऊ आमदार नसल्याचा दावा कमल नाथ यांनी केला. महाराष्ट्रात बंडखोर नेत्यांमुळे सरकार संकटात सापडल्याचे स्पष्ट होताच सोनिया यांनी कमल नाथ यांच्याशी चर्चा केली. त्यानंतरच कमल नाथ यांच्यावर महाराष्ट्राचे निरिक्षक म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. आपल्या मुंबई दौऱ्यात कमल नाथ मविआमधील ज्येष्ठ नेत्यांकडून संपूर्ण घटनाक्रम जाणून घेणार आहेत. त्यानंतर ते राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्याशीही चर्चा करणार आहेत. यादरम्यान महाराष्ट्र सरकारमध्ये असलेल्या काँग्रेसने त्यांचे सर्वच्या सर्व ४४ आमदार हे बाळासाहेब थोरात यांच्या संपर्कात असल्याचे स्पष्ट केले. विधान परिषद निवडणुकीनंतर शिवसेनेबरोबरच काँग्रेसचेही काही आमदार नॉट रिचेबल झाल्याची चर्चा होती. त्याचे खंडन करताना काँग्रेसने सर्वच सर्व आमदार थोरात यांच्या संपर्कात असल्याचे म्हटले आहे. महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांनीही नागपूरमध्ये पत्रकारांशी बोलताना मविआ सरकारला कुठलाही धोका नसल्याचे सांगितले होते. तसेच भाजप ज्याप्रकारे देशात राजकारण करत आहे तेच महाराष्ट्रातील संकटाचे कारण असल्याचेही ते म्हणाले होते.

# सांसों में तूफानों का डेरा, निगाहें जैसे चील का पहरा'...

रणबीर कपूरचा बहुचर्चित 'शमशेरा' चित्रपटाचा फर्स्ट लुक रिलीज झाल्यानंतर चित्रपटाच्या निर्मात्यांनी आता चित्रपटाचे टीझर सुद्धा रिलीज केले आहे. या टीझरमध्ये शमशेराची भूमिका साकरणाऱ्या रणबीर कपूरचा लूक आणि डायलॉग ऐकून अंगावर शहारे येत आहेत. रणबीर कपूर शिवाय या टीझरमध्ये संजय दत्तची झलक सुद्धा दिसत आहे. चित्रपटात रणबीर कपूर आणि संजय दत्तचा अंदाज खूप घातक




असल्याचे दिसत आहे.

टीझरमध्ये "सांसों में तूफानों का डेरा, निगाहें जैसे चील का पहरा, कोई रोक ना पाएगा इसे, जब उठे ये बनके सवेरा' असा डायलॉग रणबीर बोलताना दिसत आहे". 'शमशेरा' चित्रपटामध्ये रणबीर कपूर दोन भूमिका साकारताना दिसेल. रणबीर कपूरचा हा पहिला चित्रपट आहे ज्यामध्ये तो दोन भूमिका साकारत आहे.चित्रपटातील रणबीर कपूरच्या एक पात्राचे नाव शमशेरा आहे तर दुसऱ्या पात्राचे नाव बल्लीआहे. या चित्रपटासाठी रणबीर कपूरने खूप मेहनत घेतली आहे. शमशेरासाठी रणबीर कपूरने तलवार चालवायचा सराव केला तसेच तो घोडस्वारी देखील शिकला.

रणबीर कपूर आणि संजय दत्त आमने सामने 'शमशेरा' चित्रपटामध्ये रणबीर कपूर आणि संजय दत्त यांच्यामध्ये जबरदस्त फाइट सीन्स असणार आहेत. तसेच यातील काही फाइट सीन्स घोड्यावर बसून केले आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार,'शमशेरा' चित्रपटामध्ये फाइट सीनमध्ये एकूण ८० घोड्यांचा वापर करण्यात आला आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन करण मल्होत्राने केले असून रणबीर कपूर शिवाय या चित्रपटात वाणी कपूर, संजय दत्त, आशुतोष राणा , रोनिर रॉय आणि सौरभ शुक्ला हे कलाकार आहेत.

२२ जुलै रोजी रिलीज होणार 'शमशेरा'

१५० करोडच्या बजेटमध्ये तयार झालेला 'शमशेरा' चित्रपट २२ जुलैला रिलीज होणार आहे. हा चित्रपट हिंदी व्यतिरिक्त तमिळ आणि तेलगू भाषेमध्ये सुद्धा रिलीज होणार आहे.

## राजर्षी शाहू महाराजांच्या जीवनकार्यावर भव्य चित्रपट निर्मिती

ब्रिटीश राजसत्तेच्या काळात रयतेला न्याय मिळवून देण्यासाठी व बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी लढणारे, सनातनी वर्गाच्या विरोधाला न जुमानता दलित व मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या छत्रपती शाहू महाराजांचे जीवनकार्य चित्रपटाद्वारे जनसामान्यांपर्यत पोहचविण्याचा होणारा हा प्रयत्न कौतुकास्पद आहे

अलीकडच्या काळात मराठी चित्रपटसृष्टीत ऐतिहासिक चित्रपटांची निर्मिती मोठया प्रमाणावर होताना दिसतेय आणि



रसिकप्रेक्षकही त्याला मनापासून दाद देताना दिसताहेत. अशाच वेळी महाराष्ट्राच्या आणि देशाच्याही इतिहासात मानाचं आणि अभिमानाचं स्थान असलेल्या लोककल्याणकारी राजे राजर्षी शाहू महाराजांच्या जीवनकार्यावर आधारित भव्य मराठी चित्रपटाच्या निर्मीतीची घोषणा करण्यात आली आहे. चित्रपटाचे नाव आहे... 'शाहू छत्रपती'.

ब्रिटीश राजसत्तेच्या काळात रयतेला न्याय मिळवून देण्यासाठी व बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी लढणारे, सनातनी वर्गाच्या विरोधाला न जुमानता दलित व मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या छत्रपती शाहू महाराजांचे जीवनकार्य चित्रपटाद्वारे जनसामान्यांपर्यत पोहचविण्याचा होणारा हा प्रयत्न कौतुकास्पद आहे.

डॉ.जितेंद्र आव्हाड प्रस्तुतकर्ता असलेल्या 'शाहू छत्रपती' चित्रपटाची कथा ज्येष्ठ लेखक डॉ. जयसिंगराव पवार यांच्या अनेक दशकांच्या संशोधन कार्यावर आधारित असून या चित्रपटाचे दिग्दर्शन युवा दिग्दर्शक वरुण सुखराज करणार आहेत. विद्रोह फिल्म्स या चित्रनिर्मिती संस्थेतर्फे या भव्य चित्रपटाची निर्मिती करण्यात येत आहे.

यंदाचे वर्ष हे राजर्षी शाहू महाराजांचे स्मृतीशताब्दी वर्ष आहे. राजर्षी शाहूंनी

## अजय देवगणमुळे अजूनही अविवाहितच आहे तब्बू,

अजूनही लग्न का केलं नाही? अभिनेत्री तब्बूने याबाबत खुलासा केला आहे.

अभिनेत्री तब्बू आणि अजय देवणनची जोडी रुपेरी पडद्यावर सुपरहिट ठरली. नव्वदच्या दशकामध्ये या जोडीने काही सुपरहिट चित्रपट बॉलिवूडला दिले. फक्त चित्रपटांसाठीच तब्बू-अजयची मैत्री नव्हती. हे दोघं खऱ्या आयुष्यातही उत्तम मित्र-मैत्रिणी आहेत. कोणत्या ना कोणत्या मुलाखतींमधून तब्बू-अजयची मैत्री किती घट्ट आहे हे दिसून येतं.



तब्बूने अजूनही लग्न केलेलं नाही. पण तिचं लग्न अजूनही झालं नाही याला कारणीभूत अजय आहे असं तब्बूचं म्हणणं आहे.

## अशोक सराफ यांची 'कोण होणार करोडपती'च्या मंचावर हजेरी उपस्थिती!

'कोण होणार करोडपती''च्या आगामी भागात मराठी मनोरंजनसृष्टी ज्यांना 'अशोक मामा' म्हणून ओळखते असं अभिनयाचं स्वतंत्र बेट असणारे ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ उपस्थित राहणार आहेत. त्यांना या मंचावरून ऐकणं ही प्रेक्षकांसाठी निश्चितच पर्वणी ठरणार आहे

मनोरंजनसृष्टीतील अथांग सागरामध्ये अभिनयाचं स्वतंत्र बेट असणारे विनोदाचे बादशाह अशोक सराफ ज्ञान आणि मनोरंजनाच्या अद्भुत खेळात म्हणजे 'कोण होणार करोडपती'च्या मंचावर सहभागी होणार आहेत. दोन आठवड्यांपूर्वी सोनी मराठी वाहिनीवर 'कोण होणार करोडपती' या कार्यक्रमाचं नवं पर्व सुरू झालं. पहिल्या आठवड्यात ज्येष्ठ अभिनेत्री तनुजा आणि काजोल विशेष पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. तर दुसऱ्या आठवड्यात ज्येष्ठ लेखिका आणि समाजसेविका पद्मश्री सुधा मूर्ती उपस्थित होत्या.

'कोण होणार करोडपती'च्या आगामी भागात मराठी मनोरंजनसृष्टी ज्यांना 'अशोक मामा' म्हणून ओळखते असं अभिनयाचं स्वतंत्र बेट असणारे ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ उपस्थित राहणार आहेत. त्यांना या मंचावरून ऐकणं ही प्रेक्षकांसाठी निश्चितच पर्वणी ठरणार आहे. अशोक मामांनी वयाची पंच्याहत्तरी नुकतीच पूर्ण केली



असली, तरी त्यांचा या वयातला उत्साह दांडगा आहे. अशोक सराफ यांच्याबरोबर त्यांचे धाकटे बंधू सुभाष सराफ आणि पत्नी निवेदिता सराफ यांच्या भगिनी डॉ. मिनल परांजपे हेही सहभागी होणार आहेत. यशाचं शिखर गाठूनही पाय कायम जमिनीवर असणाऱ्या अशोक मामांनी विनोदी भूमिकांबरोबरच गंभीर भूमिकासुद्धा चोख बजावल्या आहेत आणि म्हणूनच काही मोजक्या चतुरस्र अभिनेत्यांमध्ये त्यांची गणना होते. सिनेसृष्टीतल्या त्यांच्या कारकिर्दीमधल्या वैविध्यपूर्ण भूमिका त्यांनी जबरदस्त अभिनयाच्या जोरावर रसिकांच्या मनावर कोरून ठेवल्या आहेत. अभिनयातल्या अशा तळपणाऱ्या सूर्याच्या

## रणवीर-दीपिका नाही तर 'ही' फ्रेश जोडी संजयलीला भन्साळींच्या पुढील चित्रपटात

बॉलिवूड चित्रपटांचे प्रसिद्ध दिग्दर्शक संजय लीला भंसाळी सध्या त्यांच्या नव्या चित्रपटाच्या तयारीमध्ये आहेत. 'पद्मावत' आणि 'गंगूबाई काठियावाडी'च्या भरघोस यशानंतर आता प्रेक्षकांचे लक्ष देखील संजय लीला भंसाळीच्या नव्या चित्रपटाकडे लागून राहिले आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार संजय लीला भंसाळी आता त्यांच्या नव्या आगामी चित्रपटाची तयारी सुरू केली आहे. तसेच या चित्रपटाची कास्टींग देखील कंफर्म केलेली आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, संजय लीला भंसाळी त्यांच्या पुढील चित्रपटासाठी एक नवी फ्रेश जोडीला संधी देणार आहेत. मीडिया रिपोर्ट्सच्या माहितीनुसार संजय लीला भंसाळीच्या आगामी चित्रपटामध्ये अभिनेता आदित्य रॉय कपूर आणि अभिनेत्री कृति सेननला कास्ट करण्यात येणार आहे.



अभिनेत्री कृति सेनन आणि अभिनेता आदित्य रॉय कपूर संजय लीला भंसाळींच्या चित्रपटामध्ये पहिल्यांदा एकत्र काम करणार आहे. मात्र याबाबत कोणतीही अधिकृत बातमी अजून समोर आलेली नाही. या चित्रपटाशिवाय आदित्य रॉय कपूर 'ओम-बॅटल विदइन' मध्ये दिसणार आहे, तसेच कृति सेनन येत्या काळात 'आदिपुरूष' मध्ये दिसून येईल. याशिवाय कृति 'गणपत', 'भेडिया' आणि 'शहजादा'मध्ये सुद्धा दिसणार आहे.

## शॉर्ट न्यूज »

### 'या' भारतीय खेळाडूसोबत लँकशायर क्लबने केला करार

**नवीदिल्ली । महाईन्यूज**

इंग्लंडला क्रिकेटचे माहेरघर मानले जाते. ब्रिटिशांमुळे जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत क्रिकेटचा प्रसार झाला. इंग्लंडमध्ये आजही पारंपरिक काऊंटी क्रिकेटला फार महत्त्व आहे. देशांतर्गत क्रिकेटमधील सर्वात जुना प्रकार अशी काऊंटीची ओळख आहे. काऊंटी क्रिकेट खेळणे ही आजही खेळाडूंसाठी मोठी प्रतिष्ठेची गोष्ट मानली जाते. आतापर्यंत काही भारतीय खेळाडूंनी देखील काऊंटी क्रिकेट खेळलेले आहे. त्यामध्ये आता लवकरच वॉशिंग्टन सुंदरचेही नाव समाविष्ट होणार आहे. लँकशायर क्रिकेट क्लबने आगामी ५० षटकांच्या चषकासाठी आणि काऊंटी चॅम्पियनशिपसाठी भारताचा अष्टपैलू खेळाडू वॉशिंग्टन सुंदरला करारबद्ध करण्याची घोषणा केली आहे. लँकशायरने आपल्या ट्विटर अकाऊंच्या माध्यमातून सुंदरला करारबद्ध केल्याची अधिकृत घोषणा केली आहे. "भारतीय आंतरराष्ट्रीय खेळाडू वॉशिंग्टन सुंदरला करारबद्ध केल्याची घोषणा करताना आम्हाला आनंद होत आहे.

# आजपासून सुरु होणार भारतीय मुलींची श्रीलंका मोहिम!

## प्रसारकांची मात्र वानवा

**।नवीदिल्ली । महाईन्यूज ।**

उद्यापासून सुरू होणार भाभारतीय महिला क्रिकेट संघांची कर्णधार मिताली राजने काही दिवसांपूर्वी सर्व प्रकारच्या क्रिकेटमधून निवृत्ती घेतली. तिच्या निवृत्तीनंतर भारतीय महिला संघ आपला पहिला आंतरराष्ट्रीय दौरा करण्यास सज्ज झाला आहे. त्यासाठी काही दिवसांपूर्वीच भारतीय महिला संघ श्रीलंकेत दाखल झाला. हरमनप्रीत कौरच्या खांद्यावर तिन्ही प्रकारच्या संघाची जबाबदारी देण्यात आली आहे. तिच्या नेतृत्त्वाखाली भारतीय मुली उद्यापासून (२३ जून) आपली श्रीलंका मोहिम सुरू करणार आहेत. मात्र, तीन टी २० आणि तीन एकदिवसीय सामन्यांचा समावेश असलेल्या या दौऱ्याला अद्यापपर्यंत प्रसारकच मिळालेला नाही.



उद्या होणाऱ्या पहिल्या टी २० सामन्यात कर्णधार हरमनप्रीत कौर आणि धडाकेबाज फलंदाज स्मृती मंधाना यांच्याकडे सर्वांच्या नजरा असणार आहेत. हरमनप्रीतने १२१ टी २० सामन्यांमध्ये दोन हजार ३१९ धावा केलेल्या आहेत. क्रिकेटच्या या सर्वात लहान प्रकारामध्ये मितालीला मागे टाकण्यासाठी तिला फक्त ४६ धावांची गरज आहे. तर, स्मृती मंधानाला टी २० क्रिकेटमध्ये दोन हजार धावा पूर्ण करण्यासाठी फक्त २९ धावांची गरज आहे. तिने जर दोन हजार धावा पूर्ण केल्या तर अशी कामगिरी करणारी ती तिसरी भारतीय महिला ठरू शकते.

बर्मिंगहॅम येथे होणाऱ्या आगामी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत क्रिकेटच्या महिलांच्या टी २० क्रिकेटचा समावेश करण्यात आला आहे. याशिवाय, आयसीसी महिला टी २० विश्वचषक स्पर्धेलाही केवळ आठ महिने बाकी आहेत. अशा स्थितीत भारतीय संघाला आपल्या मोहिमेची दमदार सुरुवात करावी लागणार आहे. महिला विश्वचषक २०२२ स्पर्धेमध्ये निराशाजनक कामगिरी केल्यानंतर भारतीय महिला संघाचा हा पहिलाच आंतरराष्ट्रीय दौरा आहे. भारत आणि श्रीलंकेदरम्यानची टी २० मालिका सुरू होण्यासाठी २४ तासांपेक्षाही कमी कालावधीत शिल्लक आहे. असे असताना हे सामने भारतात प्रसारित होणार की नाही याची अद्याप काहीही माहिती नाही. कोणत्याही प्रसारकाने हे सामने डिजिटल

# भारताचा अमेरिकेवर शानदार विजय



**।नवीदिल्ली ।**

भारतीय महिला हॉकी संघाने दिमाखदार पुनरागमन करत 'एफआयएच' प्रो लीग हॉकीमध्ये अमेरिकेविरुद्धच्या पहिल्या सामन्यात ४-२ असा विजय मिळवला. अमेरिकेकडून डॅनिएल ग्रेगाने (२८व्या मिनिटाला) गोल करत संघाला आघाडी मिळवून दिली. यानंतर भारताच्या दिप ग्रेस एक्का (३१वे मि.), नवनीत कौर (३२वे मि.) आणि सोनिका (४०वे मि.) यांनी गोल झळकावत संघाला ३-१ अशा मजबूत स्थितीत पोहोचवले. अमेरिकेच्या नतालिआ कोनेर्थने (४५वे मि.) पेनल्टी कॉर्नरच्या साहाय्याने गोल करत सामन्यात ३-२ अशी चुरस निर्माण केली. यानंतर वंदना कटारियाने (५०वे मि.) मैदानी गोल करीत भारताची आघाडी ४-२ अशी केली. संघाने अखेपर्यंत ही आघाडी कायम ठेवत विजय निश्चित केला. भारताची माजी कर्णधार आणि आघाडीपटू राणी रामपाल तंदुरुस्त नसल्याने 'एफआयएच' महिला विश्वचषक हॉकी स्पर्धेसाठी मंगळवारी घोषित करण्यात आलेल्या २० सदस्यीय संघात तिला स्थान मिळाले नाही. तिच्या अनुपस्थिती सविता संघाचे नेतृत्व करेल. तर, दीप ग्रेस एक्कावर उपकर्णधाराची जबाबदारी असेल. संघ : गोलरक्षक : सविता (कर्णधार), बिछू देवी खारिबाम; बचावपटू : दिप ग्रेस एक्का (उपकर्णधार), गुरजीत कौर, निक्की प्रधान, उदीता; मध्यरक्षक : निशा, सुशिला चानू पुखरम्बाम, मोनिका, नेहा, ज्योती, नवजोत कौर, सोनिका, सलिमा टेटे; आघाडीपटू : वंदना कटारिया, लालरेम्सियामी, नवनीत कौर, शर्मिला देवी; राखीव खेळाडू : अक्षता ढेकळे, संगिता कुमारी.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही